# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 25/05/2023 (गुरूवार) सकाळ


## घरफोडी

**१) पो.स्टे. कन्हान** :– अंतर्गत ०४ कि. मी. अंतरावरील वराडा बस स्टॉप कन्हान येथे दि. २३/०५/२०२३ चे २२.०० वा. ते दिनांक २४/०५/२०२३ चे ०८.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे– किशोर रामरतन यादव वय ३२ वर्ष रा. चांपा वराडा कन्हान ता. पारशिवनी हा मनीश रामगोपाल सोनी रा. नागपूर यांचे वराडा येथील शेतात शेत मजूर म्हणून नोकरी करत असून शेतात असलेल्या घरात २० बाय २० च्या पक्क्या सिमेंट कॉक्रेटच्या मकानात राहत असून सदर मकानाला लोखंडी मुख्य दार असून यातील नमूद घटना ता. वेळी कोणीतरी अज्ञात चोराने सदर घराचे लोखंडी दाराचे कुलुप तोडून आत प्रवेश करून घरात ठेवलेल्या १) ११ पांढरे व पिवळे रंगाचे प्लास्टीक बोरी मध्ये गहू अंदाजे प्रत्येकी ५० किलो प्रत्येकी किंमती अंदाजे १२००/– रू. १३२००/–रू , २) इलेक्ट्रिक जुनी पाण्याची मोटर किंमती अंदाजे १०००/–रू , ३) जुना कॉम्प्रेसर किंमती अंदाजे १०००/–रू, ४) लोखंडी फारा किंमती अंदाजे १४००/– रू, ५) लोखंडी पुराना वायररोप २०० किलो १००००/– रू, ६) जुनी किर्लोस्कर कंपनीची पाण्याची मोटर इंजन किंमती अंदाजे २०००/– रू, ७) हार्वेस्टर लोखंडी सिडी किंमती अंदाजे ३०००/–रू , ८) ट्रॅक्टरची नवीन कल्च प्लेट ॲसेबली किंमती २७१४०/– रू., ९) डिजल ३५ लिटर किंमती अंदाजे ३२००/–रू, असा एकुण ६१९४०/–रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा रामटेके ब. नं २८८ पोस्टे कन्हान मो. क्र. ७०२०३५०००१ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. काटोल** :– अंतर्गत तुलसी विहार खंते ले आउट काटोल येथे दि. २३/०५/२०२३ चे १६.०० वा. ते २०.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे– कुमारी मिनाक्षी केशवराव बारई, वय ३६ वर्ष, रा. काटोल ते सावरगाव रोड तुलसी विहार खंते ले आउट काटोल ही आपल्या आई–वडीलासह मार्केट मध्ये सामान घेण्याकरीता घराला कुलूप लावून गेली असता फिर्यादीचे घराचे हॉलचे कुलूप तोडून आत प्रवेश करून १) गळयातील सोन्याचे जुने वापरते नेकलेस सेट १५ ग्रॅम किंमती अंदाजे २०,०००/– रू २) एक सोन्याचा जुना वापरता चपला कंटी हार १२ ग्रॅम किंमती १८,०००/– रू ३) एकदाणी (मोठया मण्याची माळ ) जुनी वापरती आईच्या लग्नातील ४० वर्षापुर्वीची वजन ०७ ग्रॅम किंमती २०००/–रू ४) एक सोन्याची अंगठी वजन ५ ग्रॅम किंमती २२,०००/–रू. चे सोन्याचे दागीने व नगदी ४,०००/– असा एकूण ६२,०००/– रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ४५४, ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक परमेश्वर आगासे मो. नं. ८४४६२८३९२५ हे करीत आहे.

# जनावरे चोरी

**पो.स्टे. कन्हान** :– अंतर्गत ०७ कि. मी. अंतरावरील डुमरी खुर्द येथे दि. २३/०५/२०२३ चे २३/०० वा. ते दिनांक २४/०५/२०२३ चे ०४/०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– सुधाकर भगवान पडोले, वय २९ वर्ष रा. डुमरीखुर्द कन्हान ता. पारशिवनी यांच्या ७ बकऱ्या त्याचा मोठा भाऊ नामे – रोशन पडोले याने नेहमी प्रमाणे दि. २३/०५/२०२३ चे १९/०० वा. घरालगत टिनाचे शेडमध्ये बकऱ्या बांधून ठेवल्या होत्या. जेवण करून २३/०० वा. दरम्यान घरातील सर्व लोक झोपून गेले. दि. २४/०५/२०२३ चे सकाळी ०४/०० वा. फिर्यादी याचा मोठा भाऊ रोशन पडोले हा नेहमी प्रमाणे बकऱ्या सोडण्या करीता गेला असता तेव्हा त्याला तिथे टिनाचे शेडचे लाकडी पल्ले उघडे दिसले व टिनाचे शेडमध्ये जावून पाहणी केली असता ७ बकऱ्या पैकी दोन बकऱ्या जागेवर दिसल्या १) दोन मोठया पाठ लाल व काळया रंगाची अंदाजे किंमती प्रत्येकी ७०००/– रू. व २) एक बकरा पांढऱ्या रंगाचा अंदाजे किंमती ३०००/–रू. ३) दोन बकरीचे पाठ काळा व लाल रंगाचे अंदाजे किंमती १५००/– रू. असा एकुण २००००/– रूपयाचा मुद्देमाल चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा रामटेके ब. नं २८८ पोस्टे कन्हान मो. नं. ७०२०३५०००१ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर